जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
पुढारी

# कुलगुरूंची भूमिका सर्व घटकांनी समजून घ्यावी

## शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा कार्यभार अत्यंत बिकट अशा स्थितीत राज्यपालांकडून सोपवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत लावण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर होती. डॉ. शिंदे यांनी ही प्रभारी कुलगुरूपदाची जबाबदारी आजपर्यंत यशस्वीपणे पार पाडली असल्याचा अभिमान शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांना आहे. डॉ. शिंदे यांची भूमिका सर्व घटकांनी समजावून घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाच्या वतीने पत्रकातून करण्यात आले.

पत्रकात म्हटले आहे, शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात २८० महाविद्यालये आहेत. तर मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात ७६२ इतकी महाविद्यालये आहेत. तुलनेने मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे तिप्पट-चौपट आहे. याबाबत कोल्हापूर ते मुंबई प्रवास आणि इतर कामकाजाच्या



गोष्टींचा विचार केला तर कुलगुरूंची विद्यापीठातील गैरहजेरी दुर्लक्षित केली पाहिजे. यापूर्वी पुणे विद्यापीठाचा कार्यभारही त्यांनी सांभाळला आहे. विद्यापीठाच्या विविध विभागांचे मानांकन केले जाते. काही क्षेत्रांतील मानांकनात विद्यापीठाची उंची वाढली आहे. तसेच मानांकनातील घसरण आम्हास अमान्य आहे. कुलगुरूंच्या कोणत्याही चुकीच्या भूमिकेस आमचा पाठिंबा नाही. त्यामध्ये तडजोड नाही. परंतु, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल त्यांनी सुरळीत जाहीर केले त्या कामाचा आम्हास अभिमान वाटतो. पत्रकावर संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम, अध्यक्ष सुनील देसाई, सदस्य संजय पसारे, संतोष वंगार आदींची स्वाक्षरी आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
पुण्यनगरी

# प्रशासनाची विद्यापीठ हिताप्रति बांधिलकी सर्वोच्च

## संबंधित संघटनांच्या बैठकीत सूर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठ प्रशासन आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची कार्यप्रणाली आणि विद्यापीठ व विद्यार्थी हिताप्रति बांधिलकी सर्वोच्च आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत, असा सूर शिवाजी विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांच्या बैठकीत उमटला.

शिवाजी युनिव्हर्सिटी पोस्ट ग्रॅज्युएट टीचर्स असोसिएशन (सुप्टा), शिवाजी युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर फोरम, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, शिवाजी विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची विद्यापीठात बैठक झाली. या बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे कुलपतींनी विपरीत परिस्थितीत मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी सोपवली. ही जबाबदारी कुलगुरू डॉ. शिंदे कौशल्याने आणि आत्मीयतेने पार पाडत आहेत. या परिस्थितीतही शिवाजी विद्यापीठाकडेही त्यांचे बारकाईने लक्ष आहे. येथील प्रत्येक अधिकार मंडळाची बैठक, अन्य महत्त्वाच्या बैठका, परिषदा, पत्रकार



परिषद यांना ते स्वतः उपस्थित राहत आहेत. त्याशिवाय विविध नावीन्यपूर्ण उपक्रमही सुरू आहेत. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रशासनाला वेळोवेळी आदेशित करत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ प्रशासनही विद्यापीठाच्या व विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी कार्यरत आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. शिंदे आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यासोबत विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्व संघटना कटिबद्ध असून, आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत, असा सूर या बैठकीत उमटला.

या बैठकीला शिवाजी युनिव्हर्सिटी पोस्ट ग्रॅज्युएट टीचर्स असोसिएशन 'सुप्टा', शिवाजी युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर फोरम, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# कुलगुरू - प्रशासनाची विद्यापीठहिताप्रती बांधिलकी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ प्रशासन आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची कार्यप्रणाली ही विद्यापीठहिताप्रती सर्वोच्च बांधिलकी असणारी आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांनी दिली.

शिवाजी युनिव्हर्सिटी पोस्ट ग्रॅज्युएट टिचर्स असोसिएशन (सुप्टा), शिवाजी युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर फोरम, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, शिवाजी विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत संघटनांच्यावतीने आपली भूमिका स्पष्ट केली. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे उपस्थित होते. 'कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ प्रशासनही विद्यापीठाच्या व विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी कार्यतत्पर आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. शिंदे आणि विद्यापीठ प्रशासन यांच्या सोबत विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्व संघटना कटिबद्ध असून आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत,' असा सूर या बैठकीत उमटला. या बैठकीला शिवाजी युनिव्हर्सिटी पोस्ट ग्रॅज्युएट टिचर्स असोसिएशन 'सुप्टा', शिवाजी युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर फोरम, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघटना, कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांच्या बैठकीत सूर**

10 APR 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंग, प्रांत, जात, धर्मातील वाद थांबवणे आवश्यक

## डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेन

**कोल्हापूर / वैभव गोंधळी**

भारतीय समाजाला विविध प्रकारच्या असमानतेने ग्रासले आहे. केवळ भारतातच नाही, तर जगभरात रंग, प्रांत, जात आणि धर्मावरून सुरू असलेले वाद थांबवणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण हाच उपाय आहे, असे मत अमेरिकेच्या फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ लॉ येथील प्रोफेसर इमॅरिटस डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेन यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागातर्फे मंगळवार, दि. १० एप्रिलपासून आयोजित चौदा दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी आले आहेत. या कार्यशाळेत ते 'भारत व युनायटेड स्टेट्स यांचे संविधानिक कायदे : ज्वलंत मुद्दे' या विषयावर व्याख्याने, ज्वलंत मुद्द्यामध्ये ते 'असमानता, धर्म आणि सत्ता, स्थलांतर' याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या निमित्ताने त्यांच्याशी केलेली बातचीत.

**प्रश्न : जगभरात सध्या असमानतेचा मुद्दा चर्चिला जात आहे, त्या संबंधी आपल्याला काय वाटते ?**

**उत्तर :** जगभरात कमी-अधिक प्रमाणात विविध बाबींवरून असमानता आहे. भारतात जाती आणि धर्माच्या नावावरून लोक विभागत आहेत, तर अमेरिकेत वर्णद्विषावरून विद्वेष वाढत आहे. जगभरातील वंचितांच्या हितासाठी सर्वांनी आग्रही राहणे गरजेचे आहे. रंग, प्रांत, जात आणि धर्मावरून निर्माण होत असलेले वाद थांबवणे आवश्यक आहे.

**प्रश्न : भारतातील असमानता कमी करण्यासाठी काय केले पाहिजे ?**

उत्तर : आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह होणे समानतेसाठी गरजेचे आहेत. पूर्वी अमेरिकेत गोरे आणि काळे यांच्यामध्ये लग्ने होत नसत. आता मात्र सर्रास अशा प्रकारची लग्ने होतात. भारतात जाती-धर्माच्या भिंती तोडून लग्ने झाली पाहिजेत आणि त्यातून कुटुंब व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. सध्या अशा प्रकारे लग्न करणाऱ्यांना समाजाचा मोठा विरोध सहन करावा



लागतो; मात्र तरुण पिढीने जगभरातील ज्ञान मिळवल्यास पुढील काळात सर्वत्र समानता निर्माण होण्यास मदत होणार आहे. देशाचे, लोकांच्या समानतेच्या मुद्दा घेऊन लढणारा नेता तयार होणे आवश्यक आहे.

**प्रश्न : अमेरिकेमध्ये काही देशांतील लोकांच्या प्रवेशावर बंदी घातली आहे, त्यासंबंधी काय वाटते?**

**उत्तर :** अमेरिका हा मूळतः स्थलांतरितांचा देश आहे. त्यामुळे चुकीच्या लोकांचे स्थलांतर होऊ नये यासाठी दक्षता घेणे योग्य असले तरी प्रवेशबंदी करणे चुकीचे आहे. डोनाल्ड ट्रम्प राष्ट्रध्यक्ष झाल्यापासून पाच देशांच्या नागरिकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. या देशांतील नागरिक दहशतवादी आहेत, असा त्यांचा दावा आहे; मात्र त्या देशांतील काही लोक दहशतवादी असले म्हणून सर्वच लोकांना दहशतवादी समजणे चुकीचे आणि मानवतेच्या विरोधात आहे. अशा धोरणांमुळे देशाची चुकीची प्रतिमा निर्माण होते, याचे भान बाळगणे गरजेचे आहे.

**प्रश्न : भारतातील लोकांवरही अमेरिकेत नोकरी करण्यावर निर्बंध येत आहेत.**

**उत्तर :** ट्रम्प प्रशासनाने एच १ बी व्हिसाचे नियम आणखी कडक केले आहेत. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने या व्हिसा धोरणामध्ये केलेल्या नव्या बदलांचा सर्वाधिक परिणाम अमेरिकेत कामानिमित्त गेलेल्या लोकांवर होणार आहे. यामुळे भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील लोकांना याचा सर्वाधिक फटका बसणार आहे. या निर्णयामुळे अमेरिकेत उद्योजक कुशल आणि तुलनेने स्वस्त मनुष्यबळाला मुकणार आहेत. भारतासह इतर अनेक देशांतील तरुणाईला याचा फटका बसत आहे, तर सरकारच्या या निर्णयामुळे उद्योजकांच्या नफ्यावरही परिणाम होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
.10 APR 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विधी कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागातर्फे मंगळवार, दि. १० एप्रिलपासून आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा चौदा दिवस चालणार आहे, अशी माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी दिली आहे. या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ लॉ येथील प्रोफेसर इमेरिटस डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेन यांचे 'भारत व युनायटेड स्टेट्स यांचे संविधानिक कायदे : ज्वलंत मुद्दे' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

10 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात आजपासून विधी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागातर्फे मंगळवार (ता. १०) एप्रिलपासून चौदा दिवसीय आंतरराष्ट्रीय विधी कार्यशाळेचे आयोजन केले आहे, अशी माहिती विभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी दिली आहे. या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ लॉ येथील प्रोफेसर इमेरिटस डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेन यांचे 'भारत व युनायटेड स्टेट्स यांचे संविधानिक कायदे : ज्वलंत मुद्दे' या विषयावर व्याख्यान होणार आहे. २४ एप्रिलपर्यंत चालणारी ही कार्यशाळा वकील, प्राध्यापक, न्यायाधीश, विद्यार्थी तसेच पीएचडी संशोधकांसाठी उपयुक्त असून तिचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. धुपदाळे यांनी केले आहे.

10 APR 2018
लोकमत

# विद्यापीठात आजपासून आंतरराष्ट्रीय कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधि अधिविभागातर्फे आज, मंगळवारपासून चौदा दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला प्रारंभ होणार आहे. या कार्यशाळेत फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ लॉ येथील प्रोफेसर इमॅरिटस डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेन यांचे 'भारत व युनायटेड स्टेट्स यांचे संविधानिक कायदे : ज्वलंत मुद्दे' या विषयावर व्याख्यान होणार आहे, अशी माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी दिली.

10 APR 2018 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून चौदा दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागातर्फे मंगळवार (दि. १०) पासून चौदा दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ लॉ येथील प्रोफेसर इमॅरिटस, डॉ. जॉन वॉलेस वॅन डोरेन यांचे 'भारत व युनायटेड स्टेट्स यांचे संविधानिक कायदे' या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यशाळा २४ एप्रिलपर्यंत असणार आहे, अशी माहिती डॉ. विवेक धुपदाळे यांनी दिली आहे.

1 0 APR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकीचे पेपर ऑनलाईन तपासणार

## २०१८-१९ पासून अंमलबजावणी | पर्यावरणपूरक परीक्षा पद्धतीसह डिजिटल इंडियाला प्रोत्साहन

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

आयसीटीच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अभियांत्रिकी विभागाच्या काही परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जात आहेत. पर्यावरणपूरक परीक्षा पद्धतीला प्रोत्साहन देण्यासाठी २०१८–१९ या शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकीचे पेपरही ऑनलाईन पद्धतीने तपासले जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्रही ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. सध्या विद्यार्थी हितासाठी साक्षांकीत प्रत, फेरतपासणी ऑनलाईन पद्धतीने केली जात आहे. त्यामुळे परीक्षेसाठी होणारा खर्च आणि विद्यार्थ्यांची होणारी ससेहोलपट कमी झाली आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अभियांत्रिकीच्या काही मुख्य व प्रवेशपूर्व परीक्षा गेल्या काही वर्षापासून ऑनलाईन पद्धतीने होतात. या परीक्षांची पेपर तपासणीही यशस्वी झाली आहे. युजीसीने लागू केलेले व केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सुरू केलेल्या (नॅड– नॅशनल अकॅडमिक डिपॉजिटरी) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होतील. नॅड अंतर्गत विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र स्वत: प्रिंट करून घ्यावयाचे आहे. यामुळे या उपक्रमांतर्गत कागदाचा लाखो रूपयांचा खर्च कमी होणार आहे.

ऑनस्क्रिन इव्हॅल्युशन व उत्तरपत्रिका ऑनलाईन तपासल्याने गुणांची बेरीज अचूक होऊ शकते. एकदा उत्तरपत्रिका स्कॅनिंग केली की तपासणीबरोबर या उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी विद्यार्थ्यांना पाठवणे सहज शक्य होणार आहे. त्यामुळे विद्यापीठातील परीक्षा विभागाने ऑनलाईन उत्तरपत्रिका तपासणीसाठी तयारी सुरू केली आहे. तसेच शिवाजी विद्यापीठातील स्वतंत्र संगणक प्रणाली अद्ययावत असल्याने ऑनलाईन पेपर तपासणीच्या कामात अडथळे येणार नाहीत.

विद्यापीठ परीक्षेतील पेपरची फेरतपासणी, फोटोकॉपी, गुणपडताळणी ऑनलाईन पध्दतीने सुरू केली आहे. पेपर तपासण्यासाठी लागणारा वेळ वाचवण्यासाठी तीन्ही जिल्ह्यात उपकेंद्रे निर्माण केली आहेत. विद्यापीठाच्या वेबसाईटवर पीआरएन नंबर टाकून युजर आयडी व पासवर्ड तयार करून घ्यावा लागणार आहे. यानंतर लॉगईन करून फेरतपासणीसाठी अर्ज भरावा लागणार आहे. यामध्ये विद्यार्थ्याने पैसे भरल्यानंतर त्याने किती विषयाची फेरतपासणी किंवा फोटोकॉपी मागितली आहे, याची ऑनलाईन माहिती उपलब्ध होणार आहे. पेपर तपासणीनंतर या विद्यार्थ्यांना त्यांचे ऑनलाईन गुणही उपलब्ध होणार आहेत. विद्यापीठाने तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा पद्धती ऑनलाईन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. तसेच विद्यार्थी हित लक्षात घेऊन ऑनलाईन परीक्षा पद्धतीचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

### उत्तरपत्रिका ऑनलाईन तपासणीचे प्रशिक्षण आवशक



ऑनलाईन उत्तरपत्रिका तपासणी एका क्लिकवर होऊ शकते. त्यामुळे पेपर तपासणीला वेग येवून, वेळ वाचतो. मात्र उत्तरपत्रिका सोडवून स्कॅनिंग केल्या तर पाने गहाळ होण्याची शक्यता असते. त्यामुळे स्कॅनिंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

### ऑनलाईन फोटोकॉपीसाठी आलेले अर्ज


शिवाजी विद्यापीठात कला, वाणिज्य, विज्ञान या तिन्ही शाखेअंतर्गत २१ हजार ४९९ अर्ज ऑनलाईन फोटोकॉपीसाठी विद्यापीठ प्रशासनाकडे आले आहेत. तर पुनर्गुणपडताळणीसाठी १० हजार अर्ज असून, फेतपासणीसाठी ५०० अर्ज आले आहेत. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांची फोटोकॉपी पाठवली असून फेरतपासणीचे काम सुरू आहे. प्रवेश शुल्कात वाढ करण्यात आली नसल्याने विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठ जलसंधारण मोहीम राबविणार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जलयुक्त विद्यापीठ मोहिमेच्या यशस्वितेनंतर शिवाजी विद्यापीठ या वर्षीपासून जलसंधारण मोहिमेचा पुढील टप्पा हाती घेणार आहे. विद्यापीठात पुरेसा पाणीसाठा निर्माण होऊन विद्यापीठाच्या ७० लाख रुपयांच्या पाणी बिलाची बचत होत आहे. या मोहिमेचा पुढील टप्पा म्हणून विद्यापीठातील भूजल पातळी वाढविण्यासाठी 'पाणी आडवा पाणी जिरवा' ही मोहीम हाती घेत आहे, त्या अंतर्गत विद्यापीठ सुतार विहिरीच्या परिसरात छोटी छोटी शेततळी निर्माण केली जाणार आहेत.



जलयुक्त विद्यापीठ अशी शिवाजी विद्यापीठाची ओळख आहे. तीन वर्षांपूर्वी पडलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने मोठ्या प्रमाणात जलयुक्त विद्यापीठाची मोहीम हाती घेतली. त्यानंतर मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे या मोहिमेला चांगले यश आले. विद्यापीठातील अनेक तलाव आणि विहिरी ओसंडून वाहू लागल्या. हा पाणीसाठा वाढविण्यासाठी आणखी तीन शेततळ्यांची निर्मीती करण्यात आली. या शेततळ्यांच्या माध्यमातून पाणी साठ्यात आणखी वाढ झाली, तर विद्यापीठाला पाण्याच्या बिलापोटी महानगरपालिकेला द्याव्या लागणाऱ्या ७० लाख रुपयांची बचत झाली. विद्यापीठाने केलेल्या या कामगिरीची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवरही घेण्यात आली.

या मोहिमेतील पुढचा टप्पा शिवाजी विद्यापीठ हाती घेत आहे. विद्यापीठाच्या वापरासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याने यावर्षी पासून परिसरातील पाणीसाठा वाढविण्याची मोहीम विद्यापीठाने हाती घेतली आहे. त्याअंतर्गत विद्यापीठाच्या जलाशयांकडे जाणाऱ्या चरींचे पुनर्जीवन करण्यात येत आहे, तर यावर्षी काही चरी नव्याने खोदण्यात येत आहेत. त्याबरोबर सुतार विहीर या परिसरातील भौगोलिक स्थिती लक्षात घेऊन येथे नवीन शेततळी तयार करण्यात येणार आहेत. गरजेनुसार ही छोटी छोटी शेततळी तयार करण्यात येणार आहेत, तर पाणी अडवणे आणि जिरवण्यासाठी उतारांवर काही चरी काढण्यात येणार आहेत. पुढील काळात पाणी साठवण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या एकूण ८५३ एकर परिसरापैकी ६० एकर परिसरात केवळ पाच फुटांचा खड्डा खणल्यानंतर पाणी लागते. येत्या पावळ्यानंतर परिसरातील भूजल पातळीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल, असा विश्वास विद्यापीठ प्रशासनाला आहे.

10 APR 2018
लोकमत

# गोपाळ गुरु यांचे शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. १४) सकाळी साडेनऊ वाजता शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ अभ्यासक आणि जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील प्रा. डॉ. गोपाळ गुरु यांचे व्याख्यान होणार आहे. व्याख्यानाचा विषय 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही संकल्पना' असा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

## शनिवारी व्याख्यान

कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्यावतीने ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ.गोपाळ गुरू यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही संकल्पना' या विषयावर ते विवेचन करणार आहेत. शनिवारी १४ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी साडेनऊ वाजता हे व्याख्यान होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स



# हिरवीगार बागच झाली स्टडी रुम

महेश कांबळे,
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ

असह्य करणारा उकाडा आणि वातावरणातील वाढता उष्मा यामुळे उन्हाळा काहीसा त्रासदायक जाणवू लागला आहे, ऋतूबदल झाला तर त्याचा थेट परिणाम माणसाच्या आरोग्यवर होतो. उन्हाळ्यामध्ये तापमानात होणारी वाढ, प्रखर सूर्यप्रकाश यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थांना बाहेर पडणे अनेकदा नकोसे वाटते. मात्र शाळा, कॉलेज व कामानिमित्त बाहेर पडणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने यंगर्स उन्हामुळे कोमोजून जात असल्याचे चित्र शहरातील कॉलेज कॅम्पसमध्ये पाहावयास मिळत आहे. मात्र या सगळ्यात अपवाद ठरत आहे ती म्हणजे शिवाजी विद्यापीठाची बाग. कडक उन्हाळ्यातही हिरवीगार असलेली बाग आता स्टडी रुम होत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या परिसरामध्ये असणाऱ्या नैसर्गिक वातावरणाकडे सर्वचजण आकर्षित होतात. सकाळी फिरायला येणाऱ्या नागरिकांपासून ते दिवसभर रेंगाळणाऱ्या कॉलेजिअन्स प्रयन्त सर्वचजण विद्यापीठातील गार्डनचा आधार घेतात, भर उन्हामध्ये जाणवणाऱ्या झळापासून संरक्षणासाठी विद्यापीठातील गार्डन सध्या थंडगार वातावरणाचा आस्वाद देत आहे. दिवसभरामध्ये सूर्य अक्षरशः आगीचे लोळ फेकू लागला आहे. उन्हाळा जसा मनाला त्रासदायक वाटतो तसाच आरोग्याच्या दृष्टीनेही हानीकारण ठरतो. यामध्ये प्रामुख्याने आरोग्याच्या समस्या उद्‌भवतात, त्यामुळे उन्हाळ्यात आरोग्य सांभाळणे तारेवरची कसरत म्हणावी लागेल. उन्हाळ्यामध्ये भरपूर पाणी पिण्याचा सल्लाही दिला जातो. सध्या विद्यापीठाच्या परीक्षा तोंडावर आल्याने विद्यार्थ्यांची अभ्यासाची धावपळ सुरु आहे. विद्यापीठाच्या रिडींग हॉलमध्ये वातावरण खुले असले तरी उन्हामुळे थोडाफार त्रास जाणवतो. मग अशावेळी विद्यार्थ्यांची पावले वळतात ती ग्रंथालयासमोरील बागेत अथवा मुख्य इमारतीसमोरील बागेत. मोठ्या वृक्षांबरोबर छोटी मोठी टुमदार झाडे हवेत गारवा निर्माण करतात. विद्यापीठाच्या उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांनी झटून तयार हिरवीगार झालेली बाग आता मुलांना गारवा देत आहे.

> **विद्यापीठातील वातावरण आल्हादायक आहे. सध्या परीक्षांचा काळ असल्याने अभ्यासाला वेळ द्यावा लागतो. बंदिस्त खोलीत अभ्यास करण्यापेक्षा बागेत उन्हाचा त्रास जाणवत नसल्याने बागेत बसणे अधिक चांगले वाटते.**
>
> **नितीन पाटील,** विद्यार्थी



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
लोकमत

# मानांकनाची घसरण अमान्य : कर्मचारी संघ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध विभाग, क्षेत्राचे मानांकन केले जाते. काही क्षेत्रातील मानांकनात विद्यापीठाची उंची वाढली आहे. पण, मानांकन दर्जाची घसरण आम्हास अमान्य आहे. कुलगुरुंच्या चुकीच्या भूमिकेस आमचा पाठिंबा नाही, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी पत्रकाद्वारे दिली.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा निकालाबाबतच्या बिकट परिस्थितीत या विद्यापीठाचा कार्यभार शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंनी यशस्वीपणे पार पाडला. शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रात २८० महाविद्यालये आहेत आणि मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालयांची संख्या ७६२ आहे. तुलनेने मुंबई विद्यापीठाचा कार्यभार अधिक आहे. याचा विचार तसेच कोल्हापूर ते मुंबई प्रवास, आदींचा विचार केल्यास शिवाजी विद्यापीठातील कुलगुरुंची गैरहजेरी दुर्लक्षित केली पाहिजे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष देसाई यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

दिल दोस्ती
Forever Friends

नॅनोटेक्नॉलॉजीमुळे अनेक आश्चर्यकारक गोष्टींची अनुभूती घेणे शक्य होणार आहे. नॅनोटेक्नॉलॉजी म्हणजेच विविध गोष्टीतील कणांचा अभ्यास करून त्याआधारे जीवनोपयोगी वस्तू व पदार्थांची निर्मिती करणे. टेक्नॉलॉजीने मानवी जीवनात महत्त्वाचं स्थान मिळवले आहे त्यात नॅनोटेक्नॉलॉजीचा मोठा वाटा आहे. भला मोठा कॉम्प्युटर ते बॅगेत बसेल एवढा लॅपटॉप, आधुनिक मोबाइल, आरोग्याच्या संबंधित तक्रारींवरचा आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे केलेला इलाज ही सर्व नॅनोटेक्नॉलॉजीचीच करामत आहे. आगामी काळात अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षणही नॅनोटेक्नॉलॉजीच्या आधारावर बदलून गेलेले असेल.

# 'नॅनो सायन्स'मध्ये शोधा करिअरच्या वाटा

नितीश खानविलकर,
सीसीआर, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी

पारंपरिक अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांची गर्दी होत असताना शिवाजी विद्यापीठात नवनवीन अभ्यासक्रम सुरू होत आहेत. यातूनच शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात २०१२ साली तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार आणि डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रयत्नातून शिवाजी विद्यापीठात 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी'ची स्थापना करण्यात आली. या अधिविभागात आता प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून कालानुरुप शिक्षणाच्या दिशेने विद्यापीठाने टाकलेले हे कौतुकास्पद पाऊल विद्यार्थ्यांच्या जडणघडीतही महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

शिवाजी विद्यापीठातील 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी' डिपार्टमेंटमध्ये बीएस्सी, एमएस्सी असा एकत्रित पाच वर्षांचा अभ्यासक्रम शिकवला जातो. १२ वी सायन्स उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. यासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कमीतकमी ४५ टक्के तर राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे. तसेच १२ वीच्या अभ्यासक्रमावर आधारित या विभागाकडून घेण्यात येणारी स्वतंत्र परीक्षाही द्यावी लागेल. दरवर्षी या विभागात ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. तसेच फिजिक्स आणि केमिस्ट्री विषयात बीएसस्सी केलेले विद्यार्थी थेट एमएस्सीसाठी प्रवेश घेऊ शकतात. नॅनोटेक्नॉलॉजीच्या विभागात अत्याधुनिक यंत्रणाकृत वर्ग आणि प्रयोगशाळा यांसारख्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधाही देण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन संबंध आणि संशोधनास वाव, प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, निरनिराळ्या समाजभिमुख उपक्रमांचे आयोजन, वसतिगृह यांसारख्या सुविधाही अधिविभागात देण्यात आल्या आहेत. नुकत्याच 'राष्ट्रीय उच्चत्तम शिक्षा अभियानाअंतर्गत 'सेंटर फॉर नॅनोफॅब्रिक्स' ४० कोटी, 'सेंटर फॉर ग्रीन एनर्जी टेक्नॉलॉजी' २३ कोटी, आणि 'सेंटर फॉर व्ही.एल.एस.आय डिझाइन'साठी ३५ कोटी इतका निधी मंजूर झाला आहे. यासाठी अधिविभागतील प्रा.पी. एस. पाटील, डॉ. के. के.शर्मा, डॉ. के. डी. पवार, डॉ. टी. डी. डोंगरे हे काम पाहत आहेत.









## नोकरी आणि स्कॉलरशीप

नॅनोसायन्स आणि टेक्नॉलॉजी क्षेत्रात शिक्षण घेतल्यानंतर जगभरात २० लाखांपेक्षाही अधिक नोकरीच्या संधी आहेत. विविध संशोधन संस्थांमध्ये पीएचडी व पीएचडी पदव्युत्तर विद्यावेतन तसेच शास्त्रज्ञ होण्याच्या संधी आहेत. विविध अत्याधुनिक शिक्षण संकुलात अध्यापनाच्या संधीही उपलब्ध होऊ शकतात.

## अभ्यासाची सूक्ष्मता

अभ्यासक्रमामध्ये नॅनो पदार्थांचे गुणधर्म, नॅनो बायोटेक्नॉलॉजी, नॅनो इलेक्ट्रॉनिक्स, एनर्जी कनव्हर्जन अँड स्टोरेज डिव्हाईस, नॅनोकोटिंग यांसारखे विषय शिकवले जातात. एक ते १०० नॅनोमीटर या श्रेणीतील पदार्थांच्या गुणधर्मांचा अभ्यास करणे हे ध्येय असते. मानवी केसाचा ५० हजारावा भाग इतक्या अतिसुक्ष्म पातळीवर हा अभ्यास केला जातो. अलीकडे बाजारात आलेले अँटिडस्ट फॅन, अँटिस्टेन शर्ट किंवा पॅन्ट, कोटेड फूड, विशिष्ट कॅन्सर पेशी नष्ट करण्यासाठी तयार करण्यात आलेली 'टार्गेटेड ड्रग डिलिव्हरी' पद्धत ही नॅनोसायन्स आणि टेक्नॉलॉजीचीच उदाहरणे आहेत.

तंत्रज्ञानाचा आधुनिक टप्पा म्हणून नॅनोतंत्रज्ञानाकडे पहिले जात आहे. सद्या जवळजवळ सर्वच क्षेत्रात त्याचा वापर होत आहे. अनेक विकसित आणि विकसनशील देशांनी नॅनो तंत्रज्ञानातील अनेक संधी उपलब्ध करण्यास सुरवात केली आहे. नॅनो संशोधन आणि त्यावर आधारित जीवनोपयोगी वस्तू आणि पदार्थांची निर्मिती आशिया, अमेरिका, युरोपसह सर्वच देशात वाढत आहे. या क्षेत्रातील मूलगामी बदल लक्षात घेता येणारे युग हे नॅनोसायन्स आणि नॅनो रोबोटिक्सचे असेल.

**प्रमोद कसबे**, सहाय्यक प्राध्यापक,
स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी

## गुणवत्तेवर शिक्कामोर्तब

अधिविभागातील दिग्विजय पाटील या विद्यार्थ्याने कोल्हापुरी चप्पलवर बुरशी न येण्यासाठी त्यावर नॅनोकोटिंग करून आपले संशोधन पेटंट केले आहे. अजित पवार या विद्यार्थ्याने 'डाय डिग्रेडेशन' या विषयावर प्रकल्प सादर करून महाराष्ट्र विज्ञान परिषदेत प्रथम क्रमांक पटकावला. कस्तुरी रोकडे व ओजस बागल यांना राष्ट्रीय पातळीवरील वैज्ञानिक स्पर्धेत पारितोषिके मिळवली आहेत. तसेच १० विद्यार्थी 'स्प्रिंगर नेचर' प्रकाशन संस्थेत सायंटिफिक टेक्निकल रायटर या पदावर कार्यरत आहेत. तसेच पॅरिस, दक्षिण कोरिया, तैवान, जर्मनी यांसारख्या ठिकाणी अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण, संशोधन आणि रोजगार संधी आजमावत आहेत.

## मेमध्ये फॉर्म, जूनमध्ये परीक्षा

२०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षा २५ जून रोजी होईल. यासाठी ऑनलाइन फॉर्म भरावा लागेल तर ऑनलाइन फॉर्म भरण्याची मुदत ३ मे ते १६ मे पर्यंत असेल. याबाबतची अधिक माहिती http://online.shivajiuniversity.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. एकूणच नॅनोसायन्स आणि टेक्नॉलॉजी हे कालसुसंगत, उदयोन्मुख आणि आधुनिक तंत्र शिक्षणाचे उत्तम माध्यम आहे.